




# उपाय बाधित वास्तूंसाठी

एखादी वास्तू बाहेरून खूप सुंदर दिसते. आपण त्या वास्तूकडे सहज आकर्षित होतो परंतु आतमध्ये शिरल्यानंतर ती वास्तू आपल्याला आनंद देईलच असे नाही. बऱ्याचदा एखाद्या वास्तूत जातेवेळी आपला मूड व प्रकृती ठिक असते परंतु त्या वास्तूत गेल्यानंतर आपले डोके दुखू लागते व प्रकृती अस्वस्थ वाटू लागते.

या वास्तूत अशा प्रकारचे दोष का निर्माण होतात; याचे कारण म्हणजे हा सर्व मृतात्म्यांचा खेळ असतो. एखाद्या घरात बाळंतीण जाते. परंतु तिला गती मिळावी अथवा मुक्ती मिळावी म्हणून शास्त्रात सांगितलेले उपाय केले जात नाहीत. यामुळे तो आत्मा त्याच वास्तूत घुटमळत राहतो.

बऱ्याचदा हॉस्पिटल म्हटले की आपल्या अंगावर भीतीने काटा येतो व शक्यतोवर आपण हॉस्पिटलमध्ये जाणे टाळतो, कारण तेथील भयाण शांतता आपल्या मनात भीतीचे घर निर्माण करतात. हॉस्पिटलमध्ये होणारे अपघाती मृत्यू, अल्पकाळात आजाराने होणारे मृत्यू, आत्महत्या, बाळंतपणात जाणाऱ्या स्त्रिया ह्या सर्वांचे अतृप्त आत्मा राहिल्यामुळे तेथेच घोटाळत रहातात व त्यामुळे हॉस्पिटलमधील वातावरण बिघडते.

यासाठीच दिवेलागणीच्या वेळी, तसेच अमावस्या-पोर्णिमेला लहान मुलाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊ नये.

या सर्व गोष्टींना कुणी अंधश्रध्दा म्हणेल, परंतु सर्व बाजूंनी आपण त्याचा अभ्यास केल्यानंतर व तसे अनुभव घेतल्यानंतरच निश्चितच आपला ह्या गोष्टींवर विश्वास बसतो. कारण काही वास्तूत शिरल्यावर आनंद वाटतो, तर काही वास्तूत प्रवेश केल्यानंतर छातीवर दडपण आल्यासारखे वाटून डोके दुखायला लागते ह्याचे कारण काय?

### वास्तू बाधित होण्याची कारणं

बऱ्याचदा एकाच ठिकाणच्या, एकसारख्या असणाऱ्या दोन वास्तूत देखील वेगवेगळी फळे अनुभवायला मिळतात. एका घरात प्रवेश केल्यानंतर मन प्रसन्न होते. घरात सुख, शांती, समृध्दी नांदत असते. परंतु तशीच रचना असणाऱ्या दुसऱ्या वास्तूत सतत भांडणे सुरु असतात, घरात कुणी ना कुणी सतत आजारी असते, पैसे पुरत नाहीत, उपवर मुलामुलींची लग्न लवकर होत नाहीत. एकूणच या घरात सुख, शांती व समाधान मुळीच आढळत नाही. पण हे असे का होते, त्याची वेगळी कारणे कोणती.

ज्या घरात आत्महत्या वा अपघाती मृत्यू, भाजून मृत्यू, विषारी औषध प्राशन करून झालेला मृत्यू, विहीरीत पडून झालेला मृत्यू, सर्पदंश व अन्य कारणाने तरुण-तरुणी तसेच बाळंतिणीचा मृत्यू अशांमुळे त्या वास्तूत दोष निर्माण होऊन ती वास्तू बाधिक बनते.

त्याचप्रमाणे ज्या घरात नेहमी घाण, केरकचरा असतो अशी घरे मृतात्म्यांना फार आवडतात व ते तिथेच ठाण मांडून बसतात. तसेच ज्या ठिकाणी मृतांची श्राध्दे वगैरे केली जात नाहीत त्या ठिकाणीही असे उपद्रव सुरु होतात. घरात कुणी मृत झाल्यास आपल्याकडे उदक शांती करण्याची पद्धत आहे, ती पद्धत खरोखरच फार चांगली आहे. कारण त्यामुळे वास्तू शुध्द होते. बरेच लोक बाहेरून आल्यावर हात पाय धूत नाहीत. खरे तर ते फार आवश्यक आहे. काही वेळा तर स्मशानात पोहचवून परत आल्यावर देखील त्याचे शौ.... मानत नाहीत या सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.

### बाधित वास्तूकरीता उपाय

तथापि एवढी काळजी घेऊनही मुळातच वास्तू दुषित असेल तर ती शुध्द करण्यासाठी काही प्राथमिक स्वरुपाचे उपाय आहेत. वास्तू फार दूषित नसेल तर त्याचा निश्चित उपयोग होईल परंतु हे उपाय सातत्याने न कंटाळता करणे आवश्यक आहे. वास्तू किती प्रमाणात दूषित आहे, यावर हा कालावधी ठरवावा लागेल हे उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

- आपली वास्तू जास्तीत जास्त स्वच्छ व पवित्र ठेवण्याचा प्रयत्न करावा, त्यासाठी रोज देवपूजा, स्तोत्रवाचन, घरासमोर सडा शिंपडून रांगोळी काढणे, त्यात स्वस्तिक चिन्ह अवश्य असावे.
- घरात रोज गोमूत्र किंवा गंगाजल शिंपडावे, ते न मिळाल्यास हिंगाचे पाणी किंवा गुलाब जल चालेल.
- रोज जेवणापूर्वी वास्तू पुरुषासाठी वेगळा नैवेद्य आठवणीने दाखवावा.
- घरात जास्तीत जास्त शांतता ठेवण्याचा प्रयत्न करावा. तसेच घर आणि घराचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा.
- रोज घरात रामरक्षा व हनुमान स्तोत्र मोठ्याने म्हणावे.
- घरात देवासमोर अखंड नंदादीप लावावा. तसेच धूप जाळून व सुगंधित उदबत्ती लावावी.
- गुरुचरीत्राची कमीत कमी सात पारायणे तरी करावीत.
- त्याचप्रमाणे देवीकवच, कुंजिकास्तोत्र यांचे पाठ घरातील सर्वांनी करावे.
- महिलांनी संपूर्ण दुर्गासप्तशतीची कमीत कमी अकरा पारायणे पूर्ण करावीत.
- अमावास्येला तिन्हीसांजेला मुख्य दरवाज्यावरून सात वेळा दही भात उतरुन टाकावा.
- ज्या वास्तूत नित्य देवाची उपसाना तसेच नामस्मरण चालू असते, तसेच वेदमंत्रांचा घोष सुरु असतो, कुलदेवतेची उपासना सुरु असते अशा ठिकाणी दुष्ट आत्मे रहात नाहीत.
- बऱ्याचदा उपाय सुरु केल्यावर त्रास जास्त वाढतो कारण त्या दुष्ट शक्तींना ती वास्तू सोडून जाण्याची इच्छा नसते म्हणूनच त्रास वाढला तरीही आपण सुरु केलेले उपाय योग्य आहेत असे समजून ते श्रध्दापूर्वक चालू ठेवावेत. काही महिन्यांनंतर त्यांचा परिणाम दिसू लागेल. त्यामुळे घाई न करता सातत्याने सर्व उपाय करून आपली वास्तू शुद्ध व पवित्र बनवावी.